ग्रंथमालिका ‘आदर्श राष्ट्ररचना’ : हिंदु राष्ट्र–स्थापना – खंड १

# हिंदु राष्ट्र का हवे ?

## (हिंदु राष्ट्र : विश्वकल्याणार्थ कार्यरत सात्त्विक लोकांचे राष्ट्र ! )

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**
**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले,**

**श्री. रमेश हनुमंत शिंदे** (प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती)

**आणि श्री. चेतन धनंजय राजहंस** (प्रवक्ते, सनातन संस्था)



**सनातन संस्था**



**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९९, हिंदी १९७, गुजराती ७०, तेलुगु ५४, तमिळ ४४, बंगाली ३०, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**जानेवारी २०२५ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९८ लाख ६६ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

## ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे हिंदु राष्ट्राच्या स्थापनेच्या संदर्भातील अद्वितीय कार्य !



१. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष आणि कार्यारंभ (वर्ष १९९८)

२. हिंदु राष्ट्र, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर ग्रंथ-निर्मिती (वर्ष १९९५ पासून आरंभ)

३. हिंदूंना धर्मशिक्षण देणे, हिंदु धर्मरक्षण आणि हिंदु राष्ट्र-स्थापना यांविषयी हिंदूंचे प्रबोधन करणे, यांसाठी नियतकालिक 'सनातन प्रभात' मधून मार्गदर्शन

४. हिंदु राष्ट्राची छोटी प्रतिकृती असणाऱ्या सनातन आश्रमांची निर्मिती

५. साधनेचा संस्कार दृढ झालेले सहस्रो धर्मप्रसारक सिद्ध करणे

६. हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ, देशभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे संघटन अन् त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन

७. भावी हिंदु राष्ट्राचे दायित्व सांभाळण्यासाठी पुढील पिढ्यांना सक्षम करणे

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी !

सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ या सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत. जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति' आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति' या उपाधीने संबोधले जात आहे.

F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

## श्री. रमेश शिंदे (राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती)



'सनातन धर्मभूषण', 'हिंदु कुलभूषण पुरस्कार', 'सांस्कृतिक योद्धा पुरस्कार' आदी पुरस्कारांनी सन्मानित असून धर्मप्रसारक म्हणून देशभर प्रवास करतात. 'बुद्धीप्रामाण्यवाद्यांचा अहंकार', धर्मांतर, 'हिंदु राष्ट्र', 'मनुस्मृति', 'लोकशाहीतील दुष्प्रवृत्ती', 'हलाल जिहाद' आदी विषयांवरील सनातनच्या ग्रंथांचे संकलक आहेत.

---

## श्री. चेतन राजहंस (राष्ट्रीय प्रवक्ते, सनातन संस्था)



'सनातन धर्मवीर' उपाधीने सन्मानित असून विविध दूरचित्रवाहिन्यांवर हिंदु धर्माची बाजू मांडतात. सनातनच्या ग्रंथांचे संकलन करतात. तसेच हिंदूसंघटनार्थ प्रवास करतात. गोवा येथील 'वैश्विक हिंदु राष्ट्र महोत्सवा'च्या आयोजनात सक्रीय सहभाग असतो.

---

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या 'सच्चिदानंद परब्रह्म' या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये 'प.पू.' आणि 'परात्पर गुरु' या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

---

**टीप** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

# अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


卐 **मनोगत** ७

१. प्रस्तावनात्मक विवेचन १०

२. राष्ट्रीय समस्यांच्या दृष्टीकोनातून 'हिंदु राष्ट्र' का हवे ? १४

३. धार्मिक समस्यांच्या दृष्टीकोनातून 'हिंदु राष्ट्र' का हवे ? ४४

 ३ ई. हिंदूंच्या धर्मश्रद्धांच्या रक्षणासाठी ५१

 ३ ऊ. हिंदु धर्मियांना न्याय्य वागणूक मिळण्यासाठी ५६

 ३ ए. जगभरातील हिंदूंच्या रक्षणासाठी ६३

४. प्रचलित राज्यपद्धतींपेक्षा 'हिंदु राष्ट्र'च श्रेष्ठ कसे ? ६६

५. धर्माधिष्ठित 'हिंदु राष्ट्र' म्हणजे काय ? ९१

६. धर्माधिष्ठित 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी योगदान द्या ! ९४

७. अखिल मानवजातीच्या हितासाठी हिंदु धर्माधिष्ठित राज्यप्रणालीच हवी ! ९७

卐 **परिशिष्ट १ : 'हिंदु राष्ट्र' किंवा 'हिंदु राष्ट्रा'ची मागणी करणे, हे संवैधानिक कि असंवैधानिक ?** १०१

卐 **प्रस्तुत ग्रंथाचे अध्यात्मशास्त्रीय परिभाषेतील सार !** १०३


| सनातनची ग्रंथमालिका हिंदु राष्ट्राची (ईश्वरी राज्याची) स्थापना | 卐 हिंदु राष्ट्र : आक्षेप आणि खंडण<br>卐 हिंदु राष्ट्राच्या स्थापनेची दिशा |
|---|---|

## मनोगत




जगात ख्रिस्त्यांची १५७, मुसलमानांची ५२, बौद्धांची १२, तर ज्यूंचे १ राष्ट्र आहे. हिंदूंचे राष्ट्र या सूर्यमंडळात कोठे आहे ? होय, हिंदूंचे एक सनातन राष्ट्र १९४७ पर्यंत या पृथ्वीवर होते. काय आहे या राष्ट्राची आजची स्थिती ?

### आजची लोकशाही अन् छत्रपती शिवाजी महाराजांचे 'हिंदु राष्ट्र' !

'लोकांनी लोकांसाठी निवडून दिलेले लोकांचे शासन', ही लोकशाहीची व्याख्या भारतासारख्या जगातील सर्वांत मोठ्या देशासाठी मात्र 'स्वार्थांधांनी स्वार्थासाठी निवडून दिलेले स्वार्थी राज्यकर्त्यांचे शासन', अशी झाली आहे. या ग्रंथात भारतासमोरील अनेक समस्या सांगितल्या आहेत. त्या वाचून काहींच्या मनात शंका उत्पन्न होईल की, 'हिंदु राष्ट्रा'त तरी या समस्या कशा काय सुटतील ? असे इतिहासात तरी कधी घडले आहे का ? अशांनी हे समजून घ्यावे की – होय, इतिहासात असे घडले आहे ! छत्रपती शिवाजी महाराजांचे 'हिंदु राष्ट्र' स्थापन होताच त्या वेळच्या अशाच समस्या दूर झाल्या होत्या ! आजच्यासारखेच छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म होण्यापूर्वीही हिंदु स्त्रियांचे शील सुरक्षित नव्हते, प्रत्यक्ष जिजामातेच्या जाऊबाईंनाच पाणवठ्यावरून यवन सरदाराने पळवून नेले होते. त्या काळी मंदिरे भ्रष्ट केली जात होती आणि गोमातेच्या मानेवर कसायाचा सुरा कधी फिरेल, हे सांगता येत नसे. महाराजांचे 'हिंदु राष्ट्र' स्थापन होताच मंदिरे पाडणे थांबले एवढेच नव्हे, तर मंदिरे पाडून उभ्या केलेल्या मशिदींचे पूर्ववत् मंदिरांत रूपांतर झाले. डोळ्यांतून मूकपणे आसवें गाळणाऱ्या गोमाता आनंदाने हंबरू लागल्या. 'गोहत्या बंद करा !', अशा मागणीसाठी शासनाकडे लाखो स्वाक्षऱ्या गेल्या नाहीत कि, महाराजांनींही एखादे 'गोहत्या प्रतिबंधक विधेयक' मंत्रीमंडळात मांडले नाही. केवळ 'हिंदु राष्ट्रा'ची स्थापना हिंदूद्वेष्ट्यांच्या उरात धडकी भरवायला पुरेशी ठरली !

आज आपल्याला महागाई दिसते. ‘महाराजांच्या सत्ताकाळात महागाईने प्रजा भरडून निघाली होती’, असे कधी वाचले आहे का ? ‘जय जवान, जय किसान’ची घोषणा करणारे राज्यकर्ते आज जवान आणि किसान या दोघांनाही मरू देत आहेत. महाराजांना तर शेतकऱ्यांचे प्राणच नव्हेत, तर त्यांनी कष्टाने पिकवलेला भाजीपालाही मोलाचा वाटत होता. ‘शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही कोणी हात लावू नये’, अशी आज्ञाच त्यांनी केली होती. महाराजांनी ‘किसानां’च्या बरोबरीने ‘जवानां’चीही काळजी घेतली होती. लढाईत जखमी झालेल्या अनेक सैनिकांना पुरस्कारासह सोन्याचा अलंकारही देऊन ते सन्मानित करीत. कारगिल लढाईत धारातीर्थी पडलेल्या सैनिकांच्या विधवांसाठी वर्ष २०१० मध्ये ‘आदर्श’ सोसायटी बांधली गेली; पण तिच्यात एकाही सैनिकाच्या विधवेला सदनिका (फ्लॅट) मिळाली नाही. भ्रष्टासुरांनीच त्या सर्व सदनिका लाटल्या ! याउलट महाराजांनी तर सिंहगडच्या लढाईत कामी आलेल्या तानाजीच्या पुत्राचा विवाह लावून देऊन त्याच्या कुटुंबियांची काळजी घेतली !

## भारतासमोरील बाह्य समस्याही ‘हिंदु राष्ट्रा’त सुटतील !

‘हिंदु राष्ट्रा’त अंतर्गत समस्यांसह बाह्य समस्याही सुटतील. बाह्य समस्यांमध्ये पाकिस्तान आणि चीन यांचे भारतावर केव्हाही होऊ शकणारे आक्रमण, ही मुख्य समस्या आहे. शिवकाळातही अशीच स्थिती होती. औरंगजेब ‘सिवा’चे टीचभर राज्य बुडवण्यासाठी टपून बसला होता. मात्र ‘महाराजांना राज्याभिषेक होऊन ‘हिंदु राष्ट्रा’ची विधीवत् स्थापना झाली’, हे ऐकूनच तो हादरला ! त्यानंतर पुढे महाराज स्वर्गारोहण करीपर्यंत तो केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर दक्षिणेतही उतरला नाही ! एकदाका ‘हिंदु राष्ट्रा’ची स्थापना झाली की, आपले सर्व शेजारी सुतासारखे सरळ होतील!

## ‘हिंदु राष्ट्रा’त मुसलमानांचे काय करणार ?

‘हिंदु राष्ट्रा’चा विषय निघाला की, एक फाजील प्रश्न तथाकथित निधर्मीवाद्यांकडून विचारला जातो, तो म्हणजे ‘हिंदु राष्ट्रा’त मुसलमानांचे

काय करणार ?’ खरे म्हणजे हा प्रश्न मुसलमानांना पडायला हवा. त्यांना तो पडत नाही. ते ‘हसके लिया पाकिस्तान, लडके लेंगे हिंदुस्तान !’ असेच म्हणत रहातात. अर्थात् या प्रश्नालाही उत्तर आहे. आगामी ‘हिंदु राष्ट्रा’त मुसलमानांनाच नव्हे, तर सर्वच पंथियांना शिवशाहीत दिली गेली, तशीच वागणूक मिळेल !

थोडक्यात, सूर्य उगवताच काळोख आपोआपच नष्ट होतो, सर्व दुर्गंध वातावरणात विरून जातो. काळोखाला किंवा दुर्गंधाला कोणी सांगत नाही की, ‘दूर जा, सूर्य उगवतो आहे !’ आपोआपच हे सारे घडते. त्याचप्रमाणे आज भारतात पसरलेला विविध समस्यांरूपी काळोख आणि दुर्गंध ‘हिंदु राष्ट्रा’ची स्थापना होताच नष्ट होईल. धर्माचरणी राज्यकर्त्यांमुळे भारतापुढील सर्व समस्या सुटतील आणि सदाचरणामुळे सर्व जनताही सुखी होईल !

## एकट्यादुकट्या समस्येच्या विरोधात लढण्यापेक्षा ‘हिंदु राष्ट्रा’ची स्थापना करणे आवश्यक !

केवळ भारतातीलच लोकांसाठी नव्हे, तर अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी स्थापन करावयाचे ‘हिंदु राष्ट्र’ मात्र आपोआप स्थापन होणार नाही. पांडवांना केवळ पाच गावे हवी होती, तीही त्यांना सहजासहजी मिळू शकली नाहीत. आपल्याला तर काश्मीर ते कन्याकुमारी असे अखंड ‘हिंदु राष्ट्र’ हवे आहे. यासाठी मात्र मोठा लढा द्यावा लागणार आहे. भारतासमोरील एकट्यादुकट्या समस्येच्या (उदा. गोहत्या, धर्मांतर, गंगेचे प्रदूषण, काश्मीर, राममंदिर, स्वभाषारक्षण) विरोधात स्वतंत्रपणे लढण्यापेक्षा सर्व समविचारी व्यक्ती आणि संस्था यांनी मिळून ‘हिंदु राष्ट्र-स्थापना’ हेच ध्येय बाळगून कृती केली, तर हा लढा थोडा सुकर होईल.

स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, स्वातंत्र्यवीर सावरकर अशा हिंदु धर्मातील थोर-थोर पुरुषांनी चिंतिलेले असे धर्माधिष्ठित ‘हिंदु राष्ट्र’ स्थापन होण्यासाठी शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक सामर्थ्य हिंदु समाजाला मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**